## 6-वाहन चालकाची जबाबदारी,कर्तव्ये

### 1-119) वाहतूक चिन्हाचे पालन करण्याचे कर्तव्य

प्रत्येक वाहन चालकाने आज्ञासूचक वाहतूक चिन्हाद्वारे दर्शवण्यात आलेल्या सूचनानुसार आणि केंद्र शासनाने तयार केलेल्या चालनविषयक विनियमानुसार वाहन चालवले पाहिजे.कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीचे नियमन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या कोणत्याही पोलीस आधिकार्याने त्याला दिलेल्या निदेशांचे पालन केले पाहिजे.

### 2-122) वाहन धोकादायक अवस्थेत सोडून देणे

वाहन ताब्यात असणार्या कोणत्याही व्यक्तीने ते मोटार वाहन कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी त्या जागेच्या अन्य वापरदारांना धोका-अडथळा निर्माण करील,अनावश्यक गैरसॊय निर्माण करील अशा पद्धतीने,स्थितीत,परिस्थिती मध्ये सोडून देता कामा नये.

### 3-123)चालत्या वाहनाच्या बाहेरच्या फळीवरून प्रवास करण्याची परवानग़ी देणॆ

वाहन ताब्यात असणार्या / चालवणार्या कोणत्याही व्यक्तीने चालत्या वाहनाच्या बाहेरच्या फळीवरून,बॉडीभागा खेरीज अन्य ठिकाणाहून माणसांना वाहून नेता कामा नये.

### 4-125)चालकास अडथळा

वाहन चालवणार्या कोणत्याही व्यक्तीने चालकाला वाहनावर नियंत्रण ठेवण्यास अडथळा निर्माण करील, अशा रीतीने कोणत्याही माणसांना,वस्तूला परवानगी देता कामा नये.

### 5-126)अचल वाहने

वाहन ताब्यात असणार्या / चालवणार्या कोणत्याही व्यक्तीने चालकाच्या गेरहरीत ते वाहन अपघाताने चालू हॊणार नाही, अशा प्रकारे उपाययोजना केल्याशिवाय असे वाहन कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अचल राहू देणार नाही.

## 6-130)लायसन्स आणि नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्याबाबतचे कर्तव्य

सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वाहन चालकाकडे, कोणत्याही गणवेशधारी पोलीस आधिकार्याने माग़णी केली असता त्याने तपासणीसाठी आपले लायसन्स आणि नोंदणी प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

## 7-131)संरक्षक व्यवस्था नसलेल्या रेल्वे रूळ ऑलांडणीच्या ठिकाणी विशिष्ट सावधगिरी घेण्याचे कर्तव्य

संरक्षक व्यवस्था नसलेल्या रेल्वे रूळ ऑलांडणी जवळ पोहोचलेल्या प्रत्येक वाहन चालकाने आपले वाहन थांबवले पाहिजे.स्वतः वाहनातून उतरून,रूळाच्या दोन्ही बाजूंनी कोणतीही रेल्वे येत नाही याची खात्री करून घेतली पाहिजे.त्यानंतर रेल्वे रूळ ऑलांडणी वरून वाहन नेले पाहिजे.

## **8-132)**विशिष्ट प्रकरणी थांबण्याचे कर्तव्य

वाहन एखाद्या व्यक्तीला,प्राण्याला(घोडा,गुरे,हत्ती,उंट,गाढ़व,ख़ेचर,मेंढी,बकरी) किंवा वाहनाला झालेल्या अपघातात गुंतलेले असेल,अशा वेळी कोणत्याही गणवेशधारी पोलीस आधिकार्याने फर्मावले असता जास्तीत जास्त 24 तास वाहन थांबवण्याची व्यवस्था करेल.त्या आधिकार्याला,संबंधित अपघाताची बाधा पोहोचलेल्या व्यक्तीला,आपले नाव, पत्ता दिला पाहिजे.

## 9-134)अपघातामुळे इजा पोहोचलेल्या व्यक्तीच्या बाबतीत कर्तव्य

अ)जखमी व्यक्तीला सर्वात जवळच्या रुग्नालयात नेउन वैद्यकीय देखभाल प्राप्त करून देण्यासाठी सर्व वाजवी उपाय योजले पाहिजेत.

ब) सर्वात जवळच्या पोलिस ठाण्यावर लवकरात लवकर अशी घटना कळवली पाहिजे.तेथील पोलिस अधिकार्याला आवश्यक माहिती दिली पाहिजे.

क)विम्याचे प्रमाणपत्र देणार्या कंपनीला अपघात घडल्यासंबंधीची खालील माहिती लेखी स्वरूपात दिली पाहिजे.

1)विमा पॉलिसी क्रमांक, तिच्या वैधतेचा कालावधी

2)अपघाताची तारीख,वेळ,ठिकाण,

3)अपघातामध्ये जखमी / मृत झालेल्या व्यक्ती संबंधीचे तपशील

4)चालकाचे नाव,त्याच्या लायसन्सचे तपशील

### 10-231)आवाजी सिग्नल्सच्या वापरावरील निर्बंध

कोणत्याही वाहनाचा चालक गरज नसताना एकसारखा अधिक काळपर्यंत हॉर्न किंवा आवाजी इशारा करणारे दुसरे साधन वापरणार नाही.

### 11-233)वाहन मागे नेण्यावरील निर्बंध

कोणत्याही वाहनाचा चालक वाहन वळवण्यासाठी,कोणत्याही व्यक्तीला धोका,गैरसोय होणार नाही याबद्दल प्रथम स्वतःची खात्री करून घेतल्याशिवाय वाजवी रीतीने आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक जास्त अंतरापर्यंत, जास्त वेळपर्यंत वाहन मागे नेणार नाही.

### 12-235)डॉळे दिपवणा-या दिव्यावरील निर्बंध

वाहनाचा चालक त्याच्या वाहनाच्या दिव्यांचा वापर करताना, कोणत्याही व्यक्तीचे डॉळे दिपून तिला धोका,गैरसोय होणार नाही असा वापर करेल.

### 13-250)मोबाईल फोनचा वापर करण्यावर निर्बंध

कोणत्याही वाहनाचा चालक वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर करणार नाही.

---